# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


क्र. रातुमनावि/म.वि./प्रवेशक्षमतावाढ/3666. दिनांक ०२/०९/२०१६.

प्रती,

प्राचार्य/अध्यक्ष/सचिव,
सर्व संलग्नित व संचालीत महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

विषय :– सत्र २०१६–१७ साठी मंजुर प्रवेश क्षमतेच्या १० टक्के जास्तीचे प्रवेश वाढविण्याबाबत.

संदर्भ :–शासन पत्र क्र. अमवि–२०१६/कोवि/शासनपत्र/१९५७३/मवि–२/१०१८५, दि. ३०/०८/२०१६.

महोदय,

आपणांस कळविण्यात येते की, उन्हाळी २०१६ च्या १२ वी च्या परिक्षेचा निकाल मोठया प्रमाणात लागलेला असल्यामुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचीत राहू नये याकरीता महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८३ (३) (सी) नुसार विद्यापीठाला प्रवेश क्षमता मंजूरीचे असलेल्या अधिकारांतर्गत ज्या पदवीस्तरावरील (UG) अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीय प्रवेश पध्दतीने होत नाही अशा सर्व पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता सत्र २०१६–१७ करीता प्राप्त प्रस्तावानुसार मंजूर प्रवेश क्षमतेच्या २० टक्यांनी वाढविण्यात आली होती. परंतु १२ वी पुरवणी परिक्षेचा निकालानुसार बहुत:श विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याने व सदर विद्यार्थी हे प्रवेशापासून वंचित राहु नये याकरिता महाराष्ट्र शासनाने संदर्भांकीत पत्रान्वये सुचविल्याप्रमाणे विद्यापीठाद्वारे प्रवेशाची अंतीम तिथी हि १०/०९/२०१६ पर्यंत वाढविली आहे. तसेच शासन निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८३ (३) (सी) अन्वये विद्यापीठास असलेल्या अधिकारानुसार **आणखी १० टक्के प्रवेश क्षमता वाढविण्याबाबत** मा. कुलगुरुंनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम १४ (७) अंतर्गत विद्वत परिषदेच्या वतीने मंजूरी प्रदान केली आहे.

करिता आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील ज्या पदवीस्तरावरील अभ्यासक्रमात मंजुर प्रवेश क्षमतेनुसार प्रथम वर्षाचे प्रवेश पुर्ण झाल्यानंतर देखील विद्यार्थी प्रवेशासाठी प्रतिक्षा यादीत आहेत. अशा अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता आणखी १० टक्के वाढवून देण्याकरिता विद्यापीठाकडे दि. ०८/०९/२०१६ पर्यंत प्रस्ताव सादर करावा. प्रस्ताव सादर करतांना मंजुर प्रवेश क्षमतेनुसार प्रथम वर्षातील प्रतिक्षा यादीत असलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रमाणित करुन प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक राहील. यापुर्वी ज्या महाविद्यालयांनी वरिलप्रमाणे प्रस्ताव सादर केला असल्यास नव्याने प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही. **अतिरीक्त प्रवेश क्षमता ही केवळ सन २०१६–१७ पुरतीच मर्यादीत राहील व या पोटी शिक्षकांचा कार्यभार वाढल्यास कोणताही आर्थिक भार शासनावर येणार नाही तसेच दि. ०१ सप्टेंबर, २०१६ नंतर मंजुर जादाच्या प्रवेशानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांचे सत्र परिक्षेकरिता शिकवणी वर्गाचे ९० दिवस व वार्षिक परिक्षेकरिता १८० दिवस पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची राहील व याबाबत परिक्षा अर्ज व नामांकन अर्ज सादर करतांना १००/– रुपयाचे नॉन ज्युडीशियल स्टॅम्प पेपरवर हमीपत्र संबंधीत महाविद्यालयांना परिक्षा विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील कारण विद्यापीठाद्वारे परिक्षेचे वेळापत्रक निश्चित केले असून त्यात कोणताही बदल करणे अपेक्षित नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर वाढीव क्षमतेपोटी कोणत्याही महाविद्यालयांना नवीन तुकडी तसेच नवीन अतिरीक्त पद मंजूर केले जाणार नाही, याची देखील नोंद घ्यावी.**

कळावे.

आपला

(डॉ.डी.के.अग्रवाल)
संचालक (म.वि.वि.मं.)